**SAVE RANI BAGH BOTANICAL GARDEN FOUNDATION**
Reg. No. E – 29101 (Mum)
(Formerly Save Rani Bagh Botanical Garden Action Committee)

# सर्वसमावेशकता हा मुख्य हेतू असलेल्या ज्या वनस्पती उद्यानाने गेली १५६ वर्षे गरीबातल्या गरीब नागरिकाचे स्वागत केले त्या वीरमाता जिजाबाई भोसले उद्यानाच्या (राणीच्या बागेच्या) प्रवेश शुल्कात बृहन मुंबई महानगरपालिकेने केलेल्या प्रतिगामी व लोकशाही-विरोधी २०पट वाढीला विरोध करण्याची कारणे.





# Reasons for opposing BMC's retrograde and undemocratic proposal of a 20-fold entry fee hike to visit V.J.B. Udyan (Rani Bagh) that will deny poor citizens access to an egalitarian botanical garden that has welcomed them for over 156 years.

C/o Mazda House, L.B.S. Marg Ghatkopar (W) Mumbai 400086
Web: www.saveranibagh.org Email: info@saveranibagh.org Tel: 98200-85929 98198-87277

## राणीबागेची ठळक वैशिष्ट्ये

- मुंबई शहरातील सर्वात मोठी हरित सार्वजनिक खुली जागा - ५३ एकर भूखंड व्यापलेले अत्यावश्यक मुंबई शहराचे हरित-फुफ्फुस जणू!
- मुंबई शहरातील सर्वात मोठा वृक्ष-समूह (३२१३ वृक्ष) आणि सर्वाधिक वनस्पति-वैविध्य (८५० जाती) असलेले वनस्पती उद्यान.
- सर्वाधिक भेट दिले जाणारे उद्यान - रोज सरासरी ८,००० व सुटीच्या दिवशी तर ४०,००० भेट देणारे अभ्यागत.
- २-ब वारसा दर्जा असलेले एकमेव सार्वजनिक वनस्पती उद्यान.



Courtesy: Jehangir Sorabjee

## Rani Bagh's distinctive characteristics

- Island city's largest green public open space - a 53 acre vital green lung.
- Island city's largest agglomeration of trees (3213); widest plant species diversity (850).
- Most visited park – 8,000 visitors per day going up to 40,000 on holidays.
- Only heritage public botanical garden (Grade II-B under Heritage Regulations).

## राणीबाग : विशाल सार्वजनिक वनस्पती उद्यान आणि छोटे प्राणिसंग्रहालय

- सन १८६१ मध्ये समस्त नागरिकांच्या शैक्षणिक व मनोरंजनात्मक आस्वादासाठी राणीची बाग हे सार्वजनिक वनस्पती उद्यान स्थापन केले होते.
- नंतर १८९० साली त्यात छोट्या प्राणीसंग्रहालयाची भर घालण्यात आली.
- या वनस्पती उद्यानाचे सर्वात महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे - एकूण क्षेत्राच्या ६३% जागा वनस्पती उद्यान व्यापते तर प्राणीसंग्रहालय फक्त १८% जागा व्यापते.
- नागरिक ताज्या व स्वच्छ हवेकरिता आणि विश्रांतीसाठी उद्याने/मोकळ्या जागा यांना रोजच्या रोज भेटी देतात, तर प्राणिसंग्रहालयास अधूनमधून भेटी देतात.
- नियोजन समितीने (विकास आराखडा) राणीबागेचे वनस्पती उद्यान म्हणून असलेले महत्व ओळखून राणीबागेचे प्रमुख नामनिर्देशन 'वनस्पती उद्यान' व दुय्यम नामनिर्देशन 'प्राणिसंग्रहालय' असे केले आहे.



## Rani Bagh - a large public botanical garden with a small zoo attached

- **Established as a public botanical garden in 1861 for the educational and recreational enjoyment of <u>all</u> citizens.**
- **A small zoo segment introduced in 1890.**
- **Primacy of the botanical garden- Botanical garden occupies 63 percent and zoo segment occupies 18 percent of campus.**
- **Citizens visit gardens/open spaces regularly, even every day for fresh air and relaxation whereas a zoo is visited occasionally.**
- **The Planning Committee (DP) has also recognized and stressed the importance of the botanical garden by giving Rani Bagh a primary designation of 'botanical garden' and a secondary designation of 'zoo'.**

## Large crowds before penguins were introduced



## Large crowds after penguins are introduced



## प्रचंड अनावश्यक खर्च व सध्या अत्याधिक संख्येने येणारे अभ्यागत : गरिबांना उद्यानात मज्जाव करणारी शुल्कवाढ करण्याचा निव्वळ बहाणा

- पेंग्विनच्या आयातीकरिता व देखभालीकरिता करदात्यांच्या ६० कोटी रुपयांची उधळपट्टी. ज्या सामान्य करदात्यांचा पैसा खर्च झाला आहे त्यानांच वनस्पती उद्यानात प्रवेश कसा नाकारला जाऊ शकतो?
- पेंग्विन आणण्यापूर्वीच गेली कित्येक दशके सुट्टीच्या दिवशी अगर सणावारी लोक मोठ्या संख्येने (सुमारे ३०,००० ते ४०,०००) नेहमीच उद्यानाला भेट देत होते. शुल्क-वाढीसाठी मोठ्या संख्येने येणारे अभ्यागत हे कारण दाखविणे हा वरकरणी खरा वाटणारा पण प्रत्यक्षात अत्यंत चुकीचा प्रस्ताव आहे. शिवाय सध्याचा उन्हाळ्याच्या सुटीचा काळ संपताच अभ्यागतांची संख्या रोडावणे क्रमप्राप्तच आहे.
- भविष्यातील प्राणी-विभागाच्या नूतनीकरणावर योजलेला वारेमाप खर्च - सल्लागारांची धक्कादायक प्रचंड फी, अनावश्यक व अतिखर्चिक सामग्रीची आयात. या खर्चाच्या बहाण्याने प्रवेश शुल्क वाढवून समाजाच्या वंचित घटकांना उद्यानाची दारे कायमची बंद करण्याचा अश्लाघ्य प्रयत्न केला जातोय.

## Wasteful expenditure and current high number of visitors - an excuse to hike entry fee and debar the poor

- **Tax payers' money already squandered on import and maintenance of penguins (Rs. 60 crore). How can common citizens, whose money has been spent, be denied access to the entire botanical garden?**
- **High number of visitors (30,000 – 40,000) a common occurrence on holidays/festival days for the past many decades, long before introduction of penguins. Entry fee hike citing large crowds an extreme measure and specious excuse. Further, after the summer holiday season is over the crowds are bound to thin down.**
- **The huge expense proposed for future renovation of the zoo segment - outrageous consultancy fees, usage of needlessly expensive imported materials – used as an excuse to jack up the entry fee and effectively shut out underprivileged sections.**

## नागरिकांचा खुल्या जागांमध्ये प्रवेश करण्याचा मूलभूत अधिकार व मुंबई महानगरपालिकेची खुल्या जागांची देखभाल करून तेथे नागरिकांना विनाअटकाव प्रवेश देण्याची जबाबदारी



- खुल्या हरित जागांमधील प्रवेशाचा नागरिकांच्या शारीरिक व मानसिक आरोग्याशी थेट संबंध आहे आणि महानगरपालिका अशा सर्व जागांमध्ये सर्वांना प्रवेश खुला ठेवण्यास कटिबद्ध आहे.
- मुंबईतील खुल्या जागा व लोकसंख्या यांचे गुणोत्तर अतिशय कमी म्हणजे दर माणशी १.२४ चौ.मी. एवढे आहे, उलट भारत सरकारच्या नागरी व्यवहार मंत्रालयाने ठरविलेल्या मानकाप्रमाणे हे गुणोत्तर दर माणशी १० ते १२ चौ.मी. एवढे असायला हवे.
- वनस्पती उद्यानाच्या प्रवेशासाठी अवाच्या सवा शुल्क लावणे म्हणजे नागरिकांच्या प्राणवायूचा वापर करण्यावरच शुल्क लावण्यासारखे आहे.
- मुंबईतील जवळ जवळ सर्व उद्यानांच्या प्रवेशासाठी कुठलेही शुल्क आकारले जात नाही. फक्त मुंबई पोर्ट ट्रस्टच्या उद्यानासाठी रु. २ तर महाराष्ट्र निसर्ग उद्यानासाठी रु. ५ असे नाममात्र शुल्क आकारले जाते.
- फिरोजशहा मेहता गार्डन, कमला नेहरू पार्क, जोसेफ बाप्तिस्ता गार्डन (माझगाव), कूपरेज गार्डन, कुलाबा वूड्स, हिरानंदानी गार्डन्स, हॉर्निमन सर्कल उद्यान यासारख्या उत्कृष्ट निगराणी असलेल्या नामवंत उद्यानांसाठीही कुठलेच प्रवेश शुल्क आकारले जात नाही.
- राणीच्या बागेचे प्रस्तावित प्रवेश शुल्क प्रचंड संख्येने असलेल्या सामान्य नागरिकांचा मुंबईच्या सर्वात मोठ्या खुल्या सार्वजनिक जागेचा उपभोग घेण्याचा मूलभूत अधिकारच हिराऊन घेईल.

## Fundamental right of access to Open Spaces and responsibility of BMC to maintain open spaces and ensure unhindered access



- **Access to green open spaces is directly related to the physical and mental health of citizen and the BMC is duty-bound to ensure accessibility to all.**
- **Mumbai has a terribly low open space to population ratio: 1.24 sq. m. per person (BMC's Existing Land Use 2012) against the standard of 10 to 12 sq. m. per person as per Urban Development Plans Formulation & Implementation Guidelines (Ministry of Urban Affairs Government of India).**
- **Charging an exorbitant entry fee to visit a botanical garden is akin to charging citizens for breathing oxygen.**
- **Almost all gardens in Mumbai have no entry fee at all and only a few like Bombay Port Trust Garden (Rs. 2) and Maharashtra Nature Park (Rs. 5) charge a nominal entry fee.**
- **Well maintained gardens like Pherozeshah Mehta Garden, Kamala Nehru Park, Joseph Baptista Gardens (Mazagaon), Cooperage Garden, Colaba Woods, Hiranandani Gardens, Horniman Circle Gardens have no entry fee at all.**
- **The proposed Rani Bagh entry fee hike snatches away the fundamental right to enjoyment of Mumbai's largest green open public space from an overwhelming majority of common citizens.**

## खालील व्यक्ती व संस्थांच्या प्रतिनिधींनी स्वाक्षरी केलेले एक संयुक्त निषेध पत्र महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना सादर

## Protest letter addressed to the Chief Minister Maharashtra

A joint protest letter dated April 11, 2017 addressed to the Chief Minister, Maharashtra (http://www.saveranibagh.org/openLetterToCM.php) opposing the unconscionable and retrograde Rani Bagh entry fee hike was signed by the following individuals and organisation representatives:

| | | |
|---|---|---|
| 1. | Mr. Justice B.N. Srikrishna (Retd) | Retired Judge Supreme Court of India |
| 2. | Mr. D.M. Sukthankar | Former Chief Secretary, Government of Maharashtra |
| 3. | Mr. V. Ranganathan | Former Chief Secretary, Government of Maharashtra |
| 4. | Mr. Julio Ribeiro | Former Police Commissioner, Mumbai |
| 5. | Mr. Sharad Kale | Former Municipal Commissioner, Mumbai |
| 6. | Dr. Pheroza J. Godrej | President Emeritus National Society of the Friends of the Trees |
| 7. | Mr. Bittu Sahgal | Editor Sanctuary Asia |
| 8. | Ms. Anita Garware | Chairperson Indian Heritage Society-Mumbai |
| 9.. | Ms. Nayana Kathpalia and Ms. Meher Rafaat | Trustees NAGAR |
| 10. | Ms. Shirin Bharucha | Trustee OVAL Trust |
| 11. | Mr. Gerson da Cunha | Convenor AGNI |
| 12. | Ms. Sumaira Abdulali | Convenor AWAAZ Foundation |
| 13. | Dr. Mariam Dossal | Former Head Dept of History Mumbai University |
| 14. | Mr. Vikas Dilawari | Conservation architect |
| 15. | Mr. David Cardoz | Conservation architect |
| 16. | Ms. Hutokshi Rustomfram and Ms. Shubhada Nikharge | Trustees Save Rani Bagh Botanical Garden Foundation |

